# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web: www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी/२०१६-१७/ 4720 दिनांक : 21 NOV 2016

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसायिक पदविका, पदवी
व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील संस्था,

विषय : संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करताना इलिजिबिलिटी, उमेदवारांचे टीसी व मायग्रेशन प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ : मा.संचालक, यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१६/१४९७ दिनांक १५/११/२०१६.

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादी पडताळणीचे कामकाज या कार्यालयात सुरु आहे. सदर पडताळणीवेळी संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे टी. सी./मायग्रेशन व पात्रता प्रमाणपत्र विद्यापीठाकडून मिळाले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमातील मुददा क्रमांक १५ मध्ये महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५, दिनांक १७/०८/२०१५ मधील मुददा क्रमांक ९(५) मध्ये गुणवत्ता याद्या पडताळणी करुन त्या प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्यासाठी कालमर्यादा नमूद केलेली आहे.

त्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करुन आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थेतील विद्यार्थ्यांकडे इलिजिबिलीटी प्रमाणपत्र, टीसी किंवा मायग्रेशन प्रमाणपत्र नाही अशा संस्थांनी ही प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात येतील अशा आशयाचे हमीपत्र या कार्यालयास सादर करावे व गुणवत्ता यादी या कार्यालयोकडून प्रमाणित करुन घ्यावी.

सोबत : संदर्भिय पत्राची प्रत.

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk२a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/ १४८७

दिनांक : २

15 NOV 2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर

विषय : संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया पडताळणी करताना इलिजिबिलिटी ,उमेदवारांचे टीसी व मायग्रेशन प्रमाणपत्राबाबत.....

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/ २०१६/१२६७, दिनांक २१.९.२०१६ आणि क्रमांक २अ/एडीएम/गुणवत्ता यादी/२०१६/१३४४,दिनांक ६.१०.२०१६

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी पडताळणी करण्याबाबतच्या तपासणी सूची व विस्तृत सुचना संदर्भाधीन पत्रान्वये संचालनालयाने दिलेल्या आहेत. गुणवत्ता यादी पडताळणी करताना संबधित संस्थांनी त्यांचेकडे प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यापिठाचे पात्रता प्रमाणपत्र मिळत नसल्याचे विभागीय कार्यालयांनी संचालनालयास कळविले असून विद्यापीठाकडून इलिजिबिलिटी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब लागत असल्याचे निदर्शनास आणले आहे. तसेच काही विद्यार्थ्यांचे टी सी व मायग्रेशन प्रमाणपत्र विद्यापीठांकडून मिळालेले नाही.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमातील मुद्दा क्रमांक १५ मध्ये महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक१७.८.२०१५ मधील मुद्दा क्रमांक ९(५) मध्ये गुणवत्ता यादया पडताळणी करून त्या प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्यासाठी कालमर्यादा नमूद केलेली आहे.प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे इलिजिबिलिटी प्रमाणपत्र, टीसी किंवा मायग्रेशन प्रमाणपत्र नाही अशा संस्थांकडून ही प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात येतील अशा आशयाचे हमीपत्र घेऊन त्यांच्या गुणवत्ता यादया अंतिम मंजूरीसाठी मा.आयुक्त,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे सादर करण्यात याव्यात.

(डॉ.सुभाष महाजन)

संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\२०१६-१७\Merit List\Eligibility T C n Migration certificate.docx